अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शुक्रवार, दि. २२ डिसेंबर २०२३ | वर्ष : २२ वे | अंक : ७३ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

## सातार्‍याच्या आदिती स्वामीला राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार जाहीर

**सातारा** : सातारा तालुक्यातील शेरेवाडी येथील आदिती गोपीचंद स्वामी ही क्रीडा क्षेत्रातील सर्वोच्च अर्जुन पुरस्कार' मिळविणारी जिल्ह्यातील पहिली खेळाडू ठरली. क्रीडा क्षेत्रातील सर्वोच्च अर्जुन पुरस्कार मिळविण्याचे स्वप्न उराशी बाळगून खेळातील वाटचाल सुरू ठेवली होती. ते स्वप्न साकार झाल्याची प्रतिक्रिया आदितीने लोकमतशी बोलताना व्यक्त केली. या यशामुळे सातारा जिल्ह्याच्या लौकिकात भर पडली आहे.

आदिती ही अत्यंत कमी वयात जागतिक पातळीवर सर्वोच्च कामगिरी करणारी खेळाडू आहे. २०२३ मध्ये जागतिक तिरंदाजी स्पर्धेत कम्पाऊंड तिरंदाजीमध्ये तिने देशाला सुवर्णपदक मिळवून दिले. तसेच वरिष्ठ पातळीवरील तिरंदाजी स्पर्धेत सुवर्णपदक मिळवणारी पहिली भारतीय तिरंदाज ठरली. जागतिक करंडक स्पर्धेत २००६ नंतर सुवर्णपदक मिळवणारी ती सर्वांत लहान वयाची खेळाडू ठरली होती. आदितीने भारताला १४ वर्षांनंतर वर्ल्ड कपमध्ये ७२० पैकी ७११ गुण



मिळवून वर्ल्ड रेकॉर्ड करून भारताचे नाव सुवर्ण अक्षरांनी लिहिले आहे. भारताला एशियन गेम्स, एशियन चॅम्पियनशिप, वर्ल्ड कप अशा अनेक स्पर्धांमधून तिने सुवर्णपदके मिळवून दिली आहेत. माझं स्वप्न होत की, मला अर्जुन' पुरस्कार घ्यायचाच आहे; पण मला जेव्हा समजले की देशातील खेळाडूंच्यासाठी दिला जाणारा सर्वोत्कृष्ट अर्जुन पुरस्कार मला जाहीर झाला, तेव्हा मला खूप आनंद झाल्याचे आदीती स्वामीने सांगितले.

# सहलीचा आनंद क्षणिक ठरला... चालकाची डुलकी अनेकांना भोवली

## एका शिक्षकासह दोघेजण ठार; १७ जण जखमी

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**गुरूवारचा दिवस घातवार ठरला.सोलापूर जिल्ह्यात वेगवेगळ्या दोन ठिकाणी अपघात झाले, तेही पहाटेच्या सुमारास.त्यात एका शिक्षकासह दोघे ठार झाले असून १७ जण जखमी झाले.एका शाळेतील शिक्षक आणि विद्यार्थी सहल करून आपल्या गावी चालले होते परंतु या सहलीचा आनंद क्षणिक ठरला. एसटी चालकाचा ओव्हरटेक करण्याचा प्रकार अंगलट आला.एसटी आयशर ट्रकवर आदळून त्यात एका शिक्षकाचा जागीच मृत्यू झाला.अन्य दोघे शिक्षक व दोन विद्यार्थी जखमी झाले तर एका टम्पो चालकाची डुलकी एकाच्या जिवावर बेतली. टेम्पो रस्त्यावरच उलटला.**



■ माळशिरस तालुक्यातील वटपळीजवळ चक्काचूर झालेली एसटी



■ कुर्डूवाडी-शेटफळ रस्त्यावर उलटलेला टेम्पो

शिवाजी विद्यालय (बावडा, ता. इंदापूर, जि. पुणे) या शाळेची सहल कोकण दर्शनासाठी दि. १९ डिसेंबर रोजी मध्यरात्री रवाना झाली. पुणे जिल्ह्यातील या शाळेने अकलूज बस आगाराकडून तीन बस सहलीसाठी प्रासंगिक करारावर घेतल्या होत्या. दि. १९ ते २१ डिसेंबर असा सहलीचा कालावधी होता. सहलीसाठी सदर बसमध्ये ४४ विद्यार्थी व ४ शिक्षक होते. सहल संपवून बस दि. २१ डिसेंबर रोजी पहाटे साडेपाच वाजता माळशिरस तालुक्यातील वटपळी या गावाजवळ आल्या. गावाजवळील एका धोकादायक वळणावर बांबू घेऊन निघालेला एक आयशर ट्रक (एम एच ०९ एप एल ३३९८) पंक्चर झाल्यामुळे वळणात रस्त्यावर उभा होता. वळण घेत असताना बस ड्रायव्हरला (बस क्र. एम एच १४ बी टी ४७०१) ट्रकचा अंदाज आला नाही. ट्रकला साईड मारून बस पुढे काढत असताना पुढुन एक चार चाकी वाहन आडवे आल्याने बसने ट्रकला पाठीमागून धडक दिली. बस वेगात असल्याने कंडक्टरच्या साईडला पूर्णपणे फाटुन निघाली. यावेळी पुढे बसलेले शिक्षक बाळकृष्ण हरीभाऊ काळे हे जबर जखमी होऊन जागेवर मयत झाले. तर विद्यार्थीनी ज्ञानेश्वरी शेटे वय १२ वर्षे, विद्यार्थी श्रवण घाडगे वय ११ वर्षे, शिक्षिका कवडे एस. एस. व शिरसाठ आर. एस. हे जखमी झाले आहेत.

अपघातानंतर जखमींना अकलूज येथील अश्विनी हॉस्पिटल येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले.अपघातानंतर आयशर ट्रक व ड्रायव्हरला अकलूज पोलिसांनी ताब्यात घेतले. तर बस अकलूज आगारात उभी करण्यात आली. या अपघाताची माहिती मिळताच एसटी महामंडळाचे यंत्र अभियंता विवेक लोंढे व विभागीय वाहतूक अधिकारी अजय पाटील यांनी अपघातग्रस्त बस व घटनास्थळाची पाहणी केली असल्याची माहिती अकलूज आगार प्रमुख प्रमोद शिंदे यांनी दिली.

### चालकाच्या डुलकीमुळे टेम्पो उलटला; एकाचा मृत्यू, तेराजण जखमी

**कुर्डूवाडी** : हिंगोली जिल्ह्यातून पंढरपूरकडे निघालेला टेम्पो चालकास लागलेल्या डुलकीमुळे उलटला. या अपघातामध्ये एक ठार तर तेरा जण जखमी झाले. हा अपघात कुर्डूवाडी-शेटफळ रस्त्यावरील बावी गावच्या शिवारात झाला. पुण्यतिथीच्या निमित्ताने आयोजित केलेल्या कार्यक्रमासाठी वरूड (ता. सेनगाव) येथून टेम्पो (एम. एच.-३८, एक्स -१४४७) मधून प्रवास करत असतानाच कुर्डूवाडी-शेटफळ रस्त्यावरील बावी (ता. माढा, जि. सोलापूर) येथील शिवारातील सिद्धेश्वर मंदिराजवळ पोहोचला असता चालकाला लागलेल्या डुलकीमुळे गुरुवारी सकाळी तो रस्त्याच्या कडेला अचानकपणे उलटल्याने त्यात एक जणाचा जागीच मृत्यू झाला. तर १३ जण या अपघातात जखमी झाले. यात जयजयराम काशीराम शिंदे (वय-३५ दाताळा, ता.सेनगाव) यांचा जागीच मृत्यू झाला. सर्व जखमींना कुर्डूवाडी येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. यातील काहीजण गंभीर जखमी असल्याने त्यांना सोलापूर येथील सिव्हिल हॉस्पिटलला रुग्णवाहिकेने हलविण्यात आले. घटनास्थळाला कुर्डूवाडी पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक हनुमंत वाघमारे यांनी भेट देऊन पाहणी केली.

### सहलीच्या बसला अपघात...

कोकण दर्शनासाठी गेलेल्या शालेय सहलीच्या बसला अकलूज-माळशिरस रोडवरील वटपळी कॉर्नरवर झालेल्या अपघातात एका शिक्षकाचा जागेवरच मृत्यू झाला तर दोन शिक्षक आणि दोन विद्यार्थी जखमी झाले.

## विजेचा धक्का लागून वायरमनचा मृत्यू

### शेळगी परिसरातील घटना

सुराज्य/सोलापूर

विद्युत डीपीवर चढून दुरुस्तीचे काम करत असताना जोरात विजेचा धक्का लागल्याने खाली कोसळून गंभीर जखमी झालेल्या एमएसईबीच्या कंत्राटी वायरमनचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही धक्कादायक घटना गुरुवारी दुपारच्या सुमारास शेळगी परिसरातील जवाहरनगर येथे घडली.



अविनाश मूळजे (वय अंदाजे ४५) असे मरण पावलेल्या वायरमनचे नाव आहे. मयत हे शेळगी परिसरातील जवाहरनगर येथील डीपीवर चढून विद्युत दुरूस्तीचे काम करीत असताना जोराचा विद्युत झटका लागल्याने डीपीवरुनखाली कोसळून गंभीर जखमी झाले. त्या अवस्थेत त्यांना तत्काळ हैदराबाद रोडवरील यशोधरा हॉस्पिटल येथे दाखल केले. परंतु डॉक्टरांनी त्यास उपचारापूर्वीच मृत घोषित केले. ही घटना दुपारी साडे तीन वाजता घडली. सेफ्टी किट नसल्याने कंत्राटी कामगार अविनाशचा मृत्यू झाल्याची चर्चा ऐकण्यास मिळत आहे.

## पूंछमध्ये दहशतवादी हल्ल्यात तीन जवान शहीद

### भारतीय लष्कराच्या वाहनावर गोळीबार

सुराज्य/जम्मू काश्मिर

जम्मू-काश्मीरमधील पुंछ जिल्ह्यात दहशतवादी हल्ला झाला. दहशतवाद्यांनी भारतीय लष्कराच्या ट्रकवर गुरुवारी गोळीबार केला. या हल्ल्यात तीन जवानांनी आपल्या प्राणाची आहुती दिली आहे. पीटीआय वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार, भारतीय जवानांना घेऊन जाणाऱ्या ट्रकवर दहशतवाद्यांनी गोळीबार केला. दरम्यान, या भागात भारतीय लष्करावर महिनाभरात दुसरा



दहशतवादी हल्ला आहे.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, पुंछ जिल्ह्यातील सुरनकोट भागातील 'डेरा की गली' मध्ये लष्कराने शोधमोहीम सुरू केली होती. या भागात चकमक सुरू असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे. जम्मू येथील संरक्षण दलाचे प्रवक्ते लेफ्टिनेंट कर्नल सुशील बर्तवाल यांनी सांगितले की, आज संध्याकाळच्या सुमारास संपर्क साधण्यास यश मिळाले आहे. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी सायंकाळी ४ वाजण्याच्या सुमारास चकमक सुरू झाली. राष्ट्रीय रायफल्सच्या वाहनांवर सुरनकोट भागात थन्नामंडी आणि बाफलियाज भागात हल्ला झाला.

चकमक सुरू झाल्यानंतर घटनास्थळी ४८ आरआर आणि ४३ आरआरच्या जवानांसह रुग्णवाहिका पाठवण्यात आली आहे. परिसरात रहदारी थांबवण्यात आली असल्याची माहिती एका अधिकाऱ्याने दिली. दहशतवाद्यांना चोख प्रत्युत्तर देण्यासाठी सुरक्षा दलाची अतिरिक्त कुमक घटनास्थळी पाठवण्यात आल्याची माहिती आहे.

गेल्या महिन्यात राजौरीतील कालाकोटमध्ये लष्कराचे विशेष दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक झाली होती. यादरम्यान लष्कराचे दोन जवान शहीद झाले. या वर्षी एप्रिल आणि मे महिन्यात राजौरी-पुंछ भागात झालेल्या दुहेरी हल्ल्यात १० जवान शहीद झाले होते. २००३ ते २०२१ या काळात या भागात दहशतवादी आणि लष्कर यांच्यात अनेक चकमकी झाल्या. गेल्या दोन वर्षांत या भागात दहशतवादविरोधी कारवायांमध्ये लष्कराचे ३५ हून अधिक जवान शहीद झाले आहेत.

## एक हजाराची लाच घेताना ग्रामसेवकाला रंगेहाथ पकडले

**उत्तर सोलापूर** : विवाह नोंदणी दाखला देण्यासाठी एक हजार रुपयाची लाच घेताना ग्रामसेवकास लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले. विठ्ठल पांडुरंग शिंदे, (बेलाटी, उत्तर सोलापूर) असे ग्रामसेवकाचे नाव आहे.

गुरुवारी दुपारच्या सुमारास पंचायत समिती उत्तर सोलापूर या कार्यालय परिसरात ही कारवाई झाली. तक्रारदार यांनी विवाह नोंदणी दाखला मिळण्यासाठी ग्रामसेवक विठ्ठल शिंदे यांच्याकडे अर्ज केला



होता. दाखला देण्यासाठी एक हजार रुपये लाचेची मागणी ग्रामसेवकांनी केली होती. ती लाच स्वीकारताना गुरुवारी दुपारी शिंदे याला लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले. ग्रामसेवक शिंदे याच्या विरोधात सदर बजार पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्याची कार्यवाही सुरु झाली आहे.

## साक्षी मलिक, फोगटने कुस्ती सोडली!

सुराज्य/नवी दिल्ली

भारतीय कुस्तीला ऑलिम्पिक स्पर्धेत चमकावणाऱ्या महिला पैलवान साक्षी मलिक आणि विनेश फोगट यांनी अत्यंत मोठा निर्णय घेतला आहे.

दोन्ही कुस्तीपटूंनी कुस्तीला रामराम ठोकण्याची घोषणा केली. भारतीय कुस्ती महासंघाच्या अध्यक्षपदी भाजप खासदार बृजभूषण सिंह यांच्याच समर्थकाची नियुक्ती झाली आहे. संजय सिंह हे कुस्ती महासंघाचे नवे अध्यक्ष म्हणून नियुक्त झाले आहेत. मात्र ज्या बृजभूषण सिंह यांच्यावर लैंगिक छळाचे आरोप करत, तब्बल ४० दिवस दिल्लीत आंदोलन करुनही, त्यांच्याच माणसाची नियुक्ती महासंघाच्या अध्यक्षपदी विराजमान होत असेल, तर कुस्तीला रामराम ठोकलेला बरा, असं म्हणत साक्षी मलिक रडली. मलिकने महिला कुस्तीत ऑलिम्पिक पदक मिळवून दिलं होतं.

## निर्यातबंदीमुळे भारताची निर्यात ४ ते ५ अब्ज डॉलरने कमी

**नवी दिल्ली** : देशांतर्गत बाजारपेठेत गहू, तांदूळ आणि साखरेच्या किंमतीत सतत वाढ होत आहे. या वाढीवर नियंत्रण ठेवण्यासाठी, भारत सरकारनं निर्यातीवर बंदी घातली आहे.

मात्र, सरकारच्या या निर्णयाचा भारताच्या निर्यातीवर परिणाम होऊ शकतो. सरकारच्या या निर्णयामुळं २०२३-२४ या



आर्थिक वर्षात निर्यात ४ ते ५ अब्ज डॉलर्सने कमी होण्याची शक्यता आहे. लोकसभा निवडणुकीपूर्वी सरकारला महागाईबाबत कोणताही धोका पत्करायचा नाही. त्यामुळं सरकारनं गहू, तांदूळ आणि साखरेच्या निर्यातीवर बंदी घालण्यात आल्याचं बोललं जात आहे.

देशांतर्गत बाजारपेठेत असमान पावसामुळं गहू, तांदूळ आणि ऊसाच्या उत्पादनावर परिणाम झाला आहे. त्यामुळं देशांतर्गत बाजारात पीठ, तांदूळ आणि साखर महाग झाली आहे. २०२४ मध्ये लोकसभा निवडणुका होणार आहेत, त्यामुळे महागाईचा धोका पत्करू नये म्हणून सरकारने गहू, तांदूळ आणि साखरेच्या निर्यातीवर बंदी घातल्याचे बोलले जात आहे. भारत या खाद्यपदार्थांची मोठ्या प्रमाणात निर्यात करत होता.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



तो परत आलाय !

कल्याण
248-44-356

मुंबई
670-34-220

## चर्चा फिसकटली; आंदोलनाचे रविवारी बघू

### जरांगे-पाटलांचा सरकारला इशारा

सुराज्य/जालना

**राज्य सरकारचे शिष्टमंडळ मराठा आरक्षणाचे आंदोलक मनोज जरांगे यांची गुरूवारी आंतरवाली सराटीमध्ये भेट घेतली.आक्षणाच्या बाबतीत जरांगे यांनी टोकाची भूमिका घेवू नये,असा सरकारचा प्रस्ताव होता. बऱ्याच वेळ चालेल्या चर्चेतून कोणताही मार्ग निघालेला नाही. त्यामुळे सरकार अन् मनोज जरांगेंमधील बैठक निष्फळ ठरली आहे.**



नोंदी असलेल्या सबंधित नातेवाईकांना आणि सर्व रक्तातील सगेसोयरे यांना हे प्रमाणपत्र मिळावे. रक्ताचे सगेसोयरे हा शब्द आपण गृहीत धरला होता. आमच्या मामाला किंवा मावशी यांना देखील प्रमाणपत्र मिळावे, या मागणीवर जरांगे ठाम आहेत. मात्र, असे करता येणार नाही आणि तसा निर्णय देखील घेता येणार नसल्याचे गिरीश महाजन म्हणाले. त्यामुळे चर्चा फिसकटली.

यावेळी बोलतांना गरीश महाजन म्हणाले की, ओबीसीच्या आरक्षणाला धक्का न लावता आम्हाला हे आरक्षण द्यायचे आहे. चर्चेची दारे खुली असली तर मार्ग निघेल. सोयरा शब्दावरून जरांगे आणि आमची वेगळी मतं आहेत. मुंदडा केसचा संदर्भ पाहता मुंदडा मुळच्या एससी होत्या. लग्नानंतर त्या मारवाडी झाल्या. त्यामुळे, ज्यांचे कुणबी दाखले आहेत ते ओबीसी आहेत. त्यांच्या रक्तातल्या नात्यातल्या लोकांना आरक्षण देणं बंधनकारक आहे असेही महाजन म्हणाले.

### आईच्या जातीवरुन मुलांची जात ठरत नाही...

पुढे बोलतांना महाजन म्हणाले की, महिलेवरून तिच्या मुलांची जात ठरत नाही. वडिलांच्या दाखल्यावरूनच मुलांची जात ठरते. न्या. शिंदेंच्या अध्यक्षतेखाली रात्रंदिवस काम सुरू आहे. शेवटच्या माणसाची नोंद बघेपर्यंत कार्यवाही चालूच राहणार. महिन्या दीड महिन्यात हा प्रश्न निकाली लागणार आहे. आम्हाला कायद्याने टिकणारे आरक्षण द्यायचे आहे. मराठा आंदोलक मुंबईकडे जाण्याची बातमी आल्याने, काळजी म्हणून पोलिसांनी नोटीसा दिल्या आहेत. पोलिसांनी काळजी घेणे गरजेच आहे. पोलिसांना थोडी कायदा सुव्यवस्थेच्या दृष्टीने काळजी घ्यावी लागेल, असे महाजन म्हणाले आहे.

**मुख्यमंत्री शब्द पाळत नाही :** दरम्यान याबाबत बोलतांना जरांगे-पाटील म्हणाले की, समाज म्हणून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा शब्द पाळायला समाज कमी पडला नाही. त्यांचेच शब्द होते, तेच पाळत नाहीयेत. त्यांनीच लिहिलेले आहे, आम्हाला कशाला खोट ठरवतील. घोषणा मोठी झाली, घराला दरवाजा दिला, मात्र कडी कोंडा दिला नाही. १०० टक्के यात मार्ग निघेल. कायद्याच्या चौकटीत जे बसतेय तेच मागत आहोत. पुढील आंदोलनाचे २४ ला बघू, ते सरकारच्या हातात असल्याचं, जरांगे म्हणाले. मुंदडा केसचा संदर्भ पाहता मुंदडा मुळच्या एससी होत्या. लग्नानंतर त्या मारवाडी झाल्या. त्यामुळे, ज्यांचे कुणबी दाखले आहेत ते ओबीसी आहेत. त्यांच्या रक्तातल्या नात्यातल्या लोकांना आरक्षण देणं बंधनकारक आहे, असेही महाजन म्हणाले.